# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

निष्काम जन सेवाय समर्पिता

## दिनांक ३०.०४.२०११ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिं.३०.०४.२०११ रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१२.०५ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त डॉ. पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री.शिंदे राजु रामराव
३. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
४. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
८. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
९. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
१०. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
११. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१२. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१३. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१४. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१५. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१६. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
१७. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१८. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते
१९. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२०. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ
२१. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन
२२. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२३. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२४. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२५. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश

२६. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
२७. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
२८. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
२९. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३०. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
३१. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३२. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३३. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३४. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३५. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३६. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
३७. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
३८. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३९. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
४०. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
४१. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
४२. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
४३. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
४४. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४५. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४६. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४७. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४८. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
४९. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
५०. स.स.डॉ.खान जफर अहेमद
५१. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
५२. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
५३. स.स.श्री.खान आगा मिया खान
५४. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५५. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
५६. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५७. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
५८. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
५९. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत

६०. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
६१. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
६२. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
६३. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
६४. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
६५. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर
६६. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
६७. स.स.श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
६८. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
६९. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
७०. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
७१. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७२. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
७३. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
७४. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
७५. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
७६. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
७७. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
७८. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७९. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
८०. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
८१. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
८२. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
८३. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
८४. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम
८५. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
०३. स.स.श्रीमती पाटील रेखा दिनकरराव
०४. स.स.श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

मा.महापौर :सर्वसाधारण सभा दिनांक ३०-४-२०११ रोजी स्थायी समिती सदस्य व ५ विषय समित्याच्या सदस्यांची नियुक्ती करणे सर्व उपस्थित सदस्यांचे मा.आयुक्तांचे मी स्वागत करते स्थायी समितीचे ८ सदस्याच्या नियुक्ती साठी व ५ विषय समित्याचे प्रत्येकी ९ सदस्याची निवड करण्यासाठी

आजची सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे-नगर सचिव यांनी आजच्या सर्वसाधारण सभेच्या अनुषंगाने सभागृहात निवेदन करावे.

नगर सचिव — विषय : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २० (३) व ३१-अ अन्वये पालिका सदस्य म्हणून ०८ (आठ) सदस्यांची स्थायी समितीच्या रिक्त पदावर आणि कलम ३०(१) व ३१-अ अन्वये ०५ (पाच) विशेष समित्यांचे प्रत्येकी नऊ सदस्यांची नियुक्ती करणे संदर्भात.

मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा.क्र./२०१०/साप्र कक्ष ४/नपाप्र/आस्था/कावि-४८४, दिनांक १८.०५.२०१० अन्वये संयुक्त लोकशाही आघाडीची नोंदणी अंतिमरित्या कायम करून संयुक्त लोकशाही आघाडी एकूण ४२ सदस्यांनी नोंदणी अंतिमरित्या कायम केली तसेच पत्र जा.क्र./२०१०/साप्र कक्ष ४/नपाप्र/आस्था/कावि-४८५, दिनांक १८.०५.२०१० अन्वये राष्ट्रीय लोकशाही आघाडीची नोंदणी अंतिम केलेली असुन हि नोंदणी अंतिम करतांना दिनांक १३.०५.२०१०रोजी नोंदविण्यात आलेली ३५ सदस्यांची यादी रद्द करून ५६ महानगरपालिका सदस्यांची राष्ट्रीय लोकशाही आघाडी अंतिमतः नोंदविण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

०१ संयुक्त लोकशाही आघाडी ४२
भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस आय १९ + राष्ट्रवादी कॉ.पार्टी ११
शहर प्र.आ. ०३
भारतीय बहुजन महासंघ ०२
अपक्ष ०७

०२ राष्ट्रीय लोकशाही आघाडी ५६
शिवसेना ३०, भारतीय जनता पार्टी १५
आर पी आय (डि) ०२, म.न.से ०१,
अपक्ष ०८

राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील प्रभाग क्रमांक ६५चे पालिका सदस्याच्या अनर्हतेमुळे आता राष्ट्रीय लोकशाही आघाडीची संख्या ५५ इतकी झाली आहे.

अंतिमरित्या आघाडीच्या नोंदणीप्रमाणे व सार्वत्रिक निवडणूक-२०१० मध्ये इतर पक्षांचे तौलनिक संख्याबळानुसार स्थायी समितीसाठी १६ सदस्यांचे नामनिर्देशन करण्याकरीता नोंदणीकृत आघाडी/गट/पक्षाचे तौलनिक संख्याबळ खालील प्रमाणे होते.

| अ. क्र. | नोंदणीकृत आघाडी/गट/पक्ष | सदस्य संख्या | टक्केवारी | नामनिर्देशित करावयाचे सदस्य संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | संयुक्त लोकशाही आघाडी | ४२ | ६.७८७ | ०७ |
| ०२ | राष्ट्रीय लोकशाही आघाडी | ५६ | ९.०५० | ०९ |
| ०३ | अपक्ष | ०१ | ०.१६१ | ०० |

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य संख्या आता ५५ आहे. त्यानुसार त्यांची टक्केवारी ८.८८८ म्हणजेच नामनिर्देशित करावयाची संख्या ९ इतकीच होते. त्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे नामनिर्देशित करावयाच्या एकुण सदस्य संख्येत बदल होत नाही. वरील प्रमाणे तौलनिक संख्याबळानुसार सर्वसाधारण सभा दिनांक २०.०५.२०१० चे विषय क्रमांक ०३ अन्वये संयुक्त लोकशाही आघाडी व राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे खालील प्रमाणे १६ सदस्यांची स्थायी समितीवर नियुक्ती करण्यात आलेली होती.

संयुक्त लोकशाही आघाडीचे सदस्य (सात सदस्य)

०१. स.श्री.अमित सुधाकर भुईगळ
०२. स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
०३. स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
०४. स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.श्री.मधुकर दामोधर सावंत
०६. स.श्री.जुबेरगाझी असीर अहमद
०७. स.श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य (नऊ सदस्य)

१. स.श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
२. स.श्री. विजय लक्ष्मणराव वाघचौरे
३. स.श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द
४. स.श्री. आगा खॉन मीयॉ
५. स.श्री. विकास रतनलाल जैन
६. स.श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
७. स.श्री. महेश शिवाजीराव माळवतकर
८. स. श्री.राजू रामराव शिंदे
९. स.श्रीमती साधना गणेश सुरडकर

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक औमपा-२०१०/८८३/प्र.क्र.१४०/नवि-२४ मंत्रालय, मुंबई दिनांक २५/०४/२०११ अन्वये संयुक्त लोकशाही आघाडीचे पालिका सदस्य श्री.प्रमोद राठोड यांनी स्थायी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे, रिक्त होणाऱ्या पदावर औरंगाबाद महानगरपालिकेच्या दिनांक १७/०८/२०१० रोजीच्या विशेष सभेतील विषय क्रमांक ६३ नुसार राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य श्री.कैलास गायकवाड यांची केलेली नामनिर्देशनाची कार्यवाही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५१ (३) नुसार विखंडीत करण्यात आली असल्याने, आता हे पद रिक्त झालेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९च्या तरतुदीनुसार दिनांक २७.०४.२०११ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेमध्ये स्थायी समितीचे आठ सदस्य चिठ्ठया टाकुन (ड्रॉ पध्दतीने) निवृत्त करणेबाबत कार्यवाही करण्यात आली असुन सदर स्थायी समितीचे सदस्य दिनांक ०१ मे २०११ रोजी दूपारी निवृत्त होतील.

| अ. क्र. | निवृत्त होणाऱ्या स्थायी समिती सदस्यांचे नांव | मा.विभागीय आयुक्त यांचेकडे नोंदणी झालेली आघाडी |
|---|---|---|
| ०१ | श्री.जैन विकास रतनलाल | राष्ट्रीय लोकशाही आघाडी |
| ०२ | श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण | राष्ट्रीय लोकशाही आघाडी |
| ०३ | श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत | राष्ट्रीय लोकशाही आघाडी |

| | | |
|---|---|---|
| ०४ | श्री.माळवतकर महेश शिवाजीराव | राष्ट्रीय लोकशाही आघाडी |
| ०५ | श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ०६ | रिक्त (श्री.प्रमोद राठोड यांनी राजीनामा दिल्यामुळे व शासन निर्णय दिनांक २५.०४.२०११ प्रमाणे) | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ०७ | श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ०८ | श्री.सावंत मधुकर दामोधर | संयुक्त लोकशाही आघाडी |

उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे दिनांक १० जानेवारी २००८च्या पत्रात स्पष्ट केले आहे की, जे सदस्य निवृत्त होत आहेत ते ज्या मान्यता प्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे, फ्रंटचे असतील त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे गटाचे, आघाडीचे, फ्रंटचे नविन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारूत आहे. तसेच कोणत्याही समितीच्या कोणत्याही कारणामुळे रिक्त होणाऱ्या जागावर, निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा, गटाचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाच्या, आघाडीचा किंवा फ्रंटच्या सदस्यांस नामनिर्देशित करणे अपेक्षित आहे. मात्र अशा वेळेस पुर्वीच्या तुलनेने पक्षांच्या/गटांच्या तौलनिक संख्येत बदल झालेला नसावा. त्याच प्रमाणे महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक औमपा/२०१०/८८३/प्रक्र-१४०/नवि-२४, मंत्रालय मुंबई दिनांक २५.०४.२०११ मध्ये नमुद केले आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९च्या कलम ३१-अ (२) नुसार संख्याबळाच्या प्रमाणात एका पक्षाच्या / गटाच्या वाटयाची जागा त्या गटाने नामनिर्देशन सादर केले नाही. या आधारावर दुसऱ्या पक्षाला/गटाला हस्तांतर करता येत नाही व कलम ३१-अ (३) खाली महानगरपालिकेस तसे करण्याचे अधिकार नाही. वर नमुद केल्याप्रमाणे दिनांक २७.०४.२०११ रोजी चिठ्ठया टाकुन (ड्रॉ पध्दतीने) निवृत्त होणाऱ्या आठ (०८) स्थायी समितीच्या सदस्यांच्या जागी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे चार (०४) व संयुक्त लोकशाही आघाडीचे चार (०४) सदस्य नियुक्त करणे अपेक्षित आहे.

अंतिमरित्या आघाडीच्या नोंदणीप्रमाणे व सार्वत्रिक निवडणूक-२०१० मध्ये इतर पक्षांचे तौलनिक संख्याबळानुसार ०५ विशेष समित्यांवर प्रत्येकी ०९ सदस्यांचे नामनिर्देशन करण्याकरीता नोंदणीकृत आघाडी/गट/पक्षाचे तौलनिक संख्याबळ खालील प्रमाणे राहिल.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे एक सदस्य अनर्ह ठरल्याने त्याची संख्या ५५ विचारात घेणे योग्य वाटते.

| अ.क्र | नोंदणीकृत आघाडी/गट/पक्ष | सदस्य संख्या | टक्केवारी | नामनिर्देशित करावयाचे सदस्य संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | संयुक्त लोकशाही आघाडी | ४२ | ३.८१८ | ०४ |
| ०२ | राष्ट्रीय लोकशाही आघाडी | ५५ | ५.००० | ०५ |
| ०३ | अपक्ष | ०१ | ०.०९० | ०० |

वरील प्रमाणे तौलनिक संख्याबळ पहाता प्रत्येक विशेष समित्यासाठी वर नमुद केल्याप्रमाणे पालिका सदस्यांचे नांवे सुचविता येतील. वरील तक्त्यातील अनुक्रमांक ०३ येथील अपक्ष यांचेकडे अपेक्षीत टक्केवारी नसल्याने त्यांचे सदस्य नियुक्त होऊ शकणार नाही.

सर्वसाधारण सभा दिनांक ३०.०४.२०११ कार्यक्रम पत्रिका १९ विषय क्रमांक २९९ ते ३०४ या संदर्भात कार्यक्रम पत्रिकेसोबत.

१) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक-२ या संदर्भांतीत दिनांक ०६ मार्च २००७ चे पत्र, त्यामध्ये तौलनिक संख्याबळानुसार पुर्णांक व अपुर्णांकाच्या आधारे तौलनिक संख्याबळ जास्त आहे अशा पक्ष किंवा गटाच्या पालिका सदस्याचे नामनिर्देशन करण्यात यावे. असे नमुद केलेले आहे.

२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१-अ खालील तरतुदी,

३) महानगरपालिकेतील स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या जागा व इतर समित्यांच्या वेळोवेळी विविध कारणांनी रिक्त होणाऱ्या जागा भरण्याच्या पध्दतीबाबत मा.उप सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांनी नगर सचिव, पुणे महानगरपालिका, पुणे यांना पाठविलेले पत्र जा.क्र.संकीर्ण २००८/१/प्र.क्र.१/२००८/नवि-३२ नगर विकास विभाग, मंत्रालय मुबई ४०००३२ दिनांक १० जानेवारी २००८, ची प्रत.

४) महानगरपालिकेच्या स्थायी समितीसह विविध समित्यांवर सदस्य नामनिर्देशित करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती संदर्भात महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक - संकिर्ण २०१०/प्रक्र ८५/नवि ३२, मंत्रालय मुंबई ४०००३२, दिनांक ०६ जुलै २०१० चे परिपत्रक जोडलेले आहेत.

**<u>विषय क्र.२९९:</u>**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (३) अन्वये स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (०८) सदस्यांच्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१- अ अन्वये पालिका सदस्यांतून ८ (आठ) सदस्यांची नियुक्ती करणे.

स.श्री. अ.साजेद अ.सत्तार यांनी मा.महापौराकडे बंद पॉकीटे देवून आपल्या जागेवर जातात.

श्री.गिरजाराम हाळनोर:राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे ४ सदस्य स्थायी समितीमध्ये रिक्त झालेल्या जागेवर जावू शकतात मी त्यांची नावे बंद पॉकीटमध्ये आपल्याकडे देत आहे.

याच वेळी स.सभागृह नेता श्री.गिरजाराम हाळनोर यांनी मा.महापौरांकडे बंद पॉकीट दिले.

श्री.प्रमोद राठोड :मी आपल्याला काल एक पत्र दिले मा.आयुक्त साहेबांना व आपल्याला त्या पत्राद्वारे संयुक्त लोकशाही आघाडीचे सर्व गटाचे आम्ही आपल्याला पत्र देत आहोत.

या वेळी स.विरोधी पक्ष नेते श्री.प्रमोद राठोड यांनी मा.महापौरांकडे बंद पॉकीटे देण्यसाठी येतात पॉकीटे मा.महापौरांना दाखवितात. यानंतर मा.महापौरांकडे बंद पॉकीटे दिले. त्यावेळी सोबत श्री.काशिनाथ कोकाटे,श्री.मिर हिदायत अली व श्री.समीर राजूरकर हे एकत्र येवुन बंद पॉकीटे देतात.

श्री.प्रमोद राठोड : मा.विभागीय आयुक्तांकडून आपल्याला एक पत्र प्राप्त झालेले आहे ते काय पत्र आहे ते कृपया सभागृहाला वाचून दाखवावे.

मा.महापौर :मा.विभागीय आयुक्त यांचेकडून जे पत्र आले ते ते नगरसचिव वाचून दाखवतील.

नगर सचिव पत्र वाचण्यासाठी उभे राहत असतांना स.श्री.काशिनाथ कोकाटे बोलण्यास सुरूवात करतात.

श्री.काशिनाथ कोकाटे:आताच मा.सचिव यांनी स्थायी समितीच्या रिक्त ८ जागा झालेल्या आहेत त्या संदर्भामध्ये तो विषय विषय पत्रिकेवरील आहे ज्या तरतुदी आहे त्यातील काही भाग व पार्टली काही भागाचे वाचन केलेले आहे.प्रत्येक पक्षाच्या स.नगरसेवकांच्या गटाला मान्यता आपण स्वत: दिली आणि प्रत्येक गटाला मान्यता दिल्यानंतर भारतीय जनता पक्षाचे एक गटनेता आपण नियुक्त केलेले आहे.राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा एक गट नेता आपण नियुक्त केलेला आहे.त्याच प्रमाणे कॉंग्रेसचे विरोधी पक्ष नेता यांना गटनेता केले आहे. त्या खालच्या जे काही नवीन सदस्य आहे त्यांचे गटाला देखिल आपण श्री. समीर राजूरकर यांना आपण मान्यता देऊन पत्र दिलेले आहे.या ठिकाणी आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो की प्रत्येक पक्षाच्या तौलनिक संख्ये ज्या स.सदस्यांच्या नियुक्त्या होणार आहे त्यानुसार मोठया पक्षाला जागा त्यांचे प्रमाणामध्ये जातील त्यानंतर जो दोन नंबरचा पक्ष असेल त्याला जातिल तिसरा असेल त्याला जाईल चौथा असेल त्यांना जाईल जर ५ नंबरचा पक्ष असेल तर त्याचा विचार करता येणार नाही.हे करीत असतांना कोणत्या पक्षाची संख्या किती आहे याची निश्चिपणे आपल्याकडे नोंद आहे आपण त्यास मान्यता दिली आहे म्हणून आमच्या सर्वांच्या याचा विचार करून या सभागृहावर कुठल्याही प्रकारचा कुणाचा ब्लेम राहणार नाही अशा प्रकारे निपक्षपातीपणे जे यामध्ये आहे सर्वसामान्याच्या दृष्टीकोनातून सभागृहाच्या संख्येनुसार या सभागृहामध्ये कुठल्याही प्रकारचा वाद वितंड होणार नाही व कोणालाही यात सक्सेफुल होता येणार नाही अशा पध्दतीचा आपण निर्णय घ्यावा.अशा निर्णयाची आपल्याकडून मला अपेक्षा आहे.आपण निर्णय घेत असतांना आम्लाहा निश्चितपणे हे सांगावे की आपण प्रत्येक पक्षाच्या गटाला मान्यता दिल्यामूळे त्यानुसार कार्यवाही करावी.

श्री.संजय केनेकर. :जे निवेदन स.सदस्यांनी केले त्यात दुरूस्ती अशी करू इच्छितो की कुठेतरी सभागृहाची दिशाभूल होते जेंव्हा विभागीय आयुक्ताकडून गटाला मान्यता घेतली ती गटाला मान्यता गटाच्या संख्येनुसार मिळाली त्यामूळे दोन गट झालेले आहे एक संयुक्त लोकशाही आघाडी दुसरा राष्ट्रीय लोकशाही आघाडी त्यामूळे गटाच्या संख्येनुसार मान्यता झालेली आहे पक्षाच्या संख्येवर गट स्थापन झालेला नाही.हे आपल्या निदर्शनास आणून देतो.

श्री.काशिनाथ कोकाटे:स.श्री.संजय केनेकर यांचा काहीतरी गैरसमज झालेला आहे.सुधारणा करण्याची आवश्यकता नाही या ठिकाणी पक्षीय बलाबलच महत्वाचे आहे.मा. विभागीय आयुक्तांना कोणताही गटनेता निवडण्याचे अधिकार नाही व ते सर्क्युलर आपणाकडे आहे ते सर्क्युलर आपण वाचू शकता.

श्री.गिरजाराम हळनोर:मा.विभागीय आयुक्त यांना गटनोता बदलण्याचा किंवा गटनेता नेमण्यात अधिकार नाही स.सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे बरोबर बोलत आहे. परंतु ज्या वेळेस गटाची स्थापना झाली त्यावेळेस माझा राष्ट्रीय लोकशाही आघाडीत गट आहे माझे सर्व सदस्यांनी मला गटनेता म्हणून मान्यता दिली आहे संयुक्त लोकशाही आघाडीच्या सदस्यांनी काय केले मला माहित नाही. परंतु माझे गटाच्या लोकांनी मला गटनेता म्हणून मान्यता दिली आहे तीच मान्यता विभागीय आयुक्तांनी मान्य केली आहे.त्याप्रमाणे गट तयार झाल्याचे

पत्र आपल्याकडे दिलेले आहे.माझी विनंती की या ठिकाणी जे तौलनिक संख्याबळ विचारात घेतल्या जाते त्यात राष्ट्रीय लोकशाही आघाडी व संयुक्त लोकशाही आघाडी अशा पध्दतीनेच घेतल्या जाते आपण नियमानुसार कार्यवाही करावी मी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या वतीने आपणाकडे स्थायी समितीच्या सदस्यासाठी बंद पॉकीटमध्ये ४ नांवे दिलेली आहे.आम्ही एर्कत्रितपणे राष्ट्रीय लोकशाही गट नेता यांच्या सहीने दिलेली ती नांवे आहे कृपया आपण ते पॉकीट उघडावे व नांवे वाचून दाखववावी.

श्री.रेणुकादास वैद्य :मागच्या वेळेसही हा प्रॉब्लेम या ठिकाणी आला होता कोणाला अधिकार आहे गटनेता यांना आहे विरोधी पक्ष नेता यांना आहे जर विरोधी पक्षातील लोकांना काही वाटत असेल त्यांचा गटनेत्यावर विश्वास नाही तर त्यांनी मा.विभागीय आयुक्त कार्यालयात जावून नवीन गट स्थापन करावा. त्यापध्दतीने त्यांनी परवानगी घ्यावी सभागृहात त्या गोष्टी करण्या पेक्ष विभागीय आयुक्त कार्यालयात या गोष्टी केल्या तर जास्त संयुक्तीक होईल असे वाटते.

श्री.प्रमोद राठोड :आताच सभागृह नेता यांनी सांगितले की त्यांनी त्यावेळी मा.विभागीय आयुक्तांकडे गट स्थापन केला आणि त्यावेळी ती नोंदणी झाली आम्हालाही मान्य आहे की त्यावेळेस संयुक्त लोकशाही आघाडीची नोंदणी झाली.परंतु त्या नोंदणी नंतर कालंतराने जे काही घडल त्यामुळे आम्ही संयुक्त लोकशाही आघाडीचे सर्व सदस्य एकत्र आहोत आमचा हा अंतर्गत प्रश्न आहे संयुक्त लोकशाही आघाडीचा गट नेता कोण असावा,म्हणून आम्ही अंतर्गत निर्णय घेवून गटनेता श्री.मीर हिदायत अली यांना केले आहे.आमच्या संयुक्त लोकशाही आघाडीमध्ये कोणताही वाद नाही. आम्ही गटनेता श्री.मिर हिदायत अली यांची निवड केल्याबध्दलचा निर्णय मा.विभागीय आयुक्त मा.महापौर, मा.आयुक्त यांना सुध्दा कळविता होता. ३८ सदस्य असलेला सर्वांनी मिळून एक गट नेता निवडला असेल तर व एक व्यक्ती जर तुम्हाला म्हणत असावा की तो गटनेता आहे किंवा काय आहे.या सभागृहात आपण विचारणा करून घ्यावी की आम्ही जो गटनेता दिला श्री.मीर हिदायत अली हे आम्हाला सर्वांना मान्य आहे तरीसुध्दा आपल्या प्रत्येक ठिकाणी आपण देखिल कोनशिलावर त्यांचे गटनेता म्हणून नाव टाकलेले आहे.प्रत्येक ठिकाणी त्यांचे पत्रिकेत नांव टाकलेले आहे.तरी सुध्दा आमच्यामध्ये दुफळी नाही हे सिध्द करण्यासाठी आज देखिल जे पत्र आपल्याकडे दिले आहे हे आम्ही विरोधी पक्ष नेता, गटनेता राष्ट्रवादी कॉग्रेस श्री. काशिनाथ कोकाटे, गटनेता शहर प्रगती आघाडी श्री.समीर राजूरकर तसेच भारीप बहुजन संघ, अपक्ष यांच सर्वानुमते आम्ही श्री.मीर हिदायत अली यांना आमच्या संयुक्त लोकशाही आघाडीचा नेता निवडला आहे सर्वांच्या मते संयुक्त रित्या आम्ही जे पत्र दिले आहे ते पत्र आपण ग्राहय धरावे कुणी एकाने पत्र देवून ते ग्राहय धरणे ३८ सदस्य एका बाजूला असतांना लोकशाही मध्ये कुणाचे म्हणणे ऐकावे हे आपल्याला देखिल चांगले माहित आहे.आपण योग्य तो निर्णय घ्यावा.कुणी एक व्यक्ती म्हणेल मी गटनेता आहे गटनेताच राहणार, आम्ही ४० लोकांचे काय आम्ही ४० सदस्य सर्वानुमते आपणला सांगत आहोत की, आमचा गटनेता श्री.मीर हिदायत अली आहे.आणि आम्ही सर्वानुमते सगंळयाच्या वतीने पत्र दिलेले आहे ते आपण उघडावे ही आमच्या सर्वांच्या वतीने विनंती आहे.

मा.महापौर :शासन निर्णय व कायद्याच्या तरतुदीनुसार वरील पैकी संयुक्त लोकशाही आघाडीचे गटनेता श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार तसेच विरोधीपक्ष नेता श्री. प्रमोद राठोड व राष्ट्रवादी कॉग्रेसचे गटनेता श्री. काशिनाथ कोकाटे यांनी सभागृहात विचारविनिमय करून चार पालिका सदस्यांचे एकमताने नांव देणे बाबत निर्णय घेऊन चार नावे माझेकडे पाठवावीत यासाठी दहा मिनिटाचा वेळ देण्यात येत आहे जेणे करून स्थायी समितीच्या चार सदस्यांची निवड करणे सोयीस्कर होईल. (वेळ दु. १२.२७ वाजता)

श्री.काशिनाथ कोकाटे:या ठिकाणी आपल्या समोर पत्र देण्यात आलेले आहे यामध्ये जो विभागीय आयुक्तांचा पुन्हा पुन्हा जो उल्लेख केला आहे विभागीय आयुक्त यांनी कधीही कुणालाही गटनेता म्हणून नियुक्त केलेले नाही.आणि आज एक पत्रही आपल्याकडे प्राप्त झालेले आहे.ते पत्रही आपण बघावे सचिव यांना सांगावे.यामध्ये पुन्हा शासनाकडे जावून किंवा यात कोणत्याही नियमाची पायमल्ली होईल अशा कुठल्याही प्रकारचे या सभागृहात घडू नये.अशी मी आपणांला विनंती करतो.

श्री.त्र्यंबक तुपे :मा.विभागीय आयुक्ताकडून कोणते पत्र आले त्यांचा खुलासा करणार होते तो करावा.

मा.महापौर :नगरसिचव यांनी पत्र वाचून दाखवावे.

नगर सचिव :मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेकडून नगरपालिका प्रशासन विभागाचे आलेले पत्र जा.क्र.११/सा.प्र./कक्ष-४ नपाप्र/आस्था/कावि-२७७/३३६० दिनांक २९-४-२०११ प्राप्त दि.३०-४-२०११.

प्रति,
मा.आयुक्त
महानगरपालिका औरंगाबाद

विषय -- औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सदस्याचे नामनिर्देशन शासन परिपत्रक क्र. संकीर्ण /२०१० /प्र.क्र.८५/नवि-३२ दिनांक ०६ जुलै २०१० प्रमाणे करणे बाबत.

संदर्भ --- श्री. प्रमोद प्र. राठोड विरोधी पक्ष नेता महानगरपालिका औरंगाबाद व श्री. काशिनाथ कोकाटे गटनेता राष्ट्रवारी कॉग्रेस श्री. मिर हिदायत अली गटनेता कॉग्रेस आय श्री. समीर राजूरकर गटनेता शहर प्रगती आघाडी व अपक्ष यांचा संयुक्त अर्ज दिं. २९-०४-२०११

उपरोक्त विषयी श्री. प्रमोद प्र. राठोड विरोधी पक्षनेता महानगरपालिका औरंगाबाद व इतर तीन जणांनी संदर्भाकिंत विनंती अर्ज या कार्यालयास सादर केला आहे.०२. सदरील अर्जाची त्या सोबतच्या सहपत्रासह प्रत प्रचलित अधिनियम /नियमाच्या तरतूदीप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी या सोबत आपणाकडे पाठविण्यात येत आहे. सोबत संदर्भाकित अर्ज दिनांक २९-४-२०११ ची त्याच्या सहपत्रासह प्रत

स्वाक्षरीत/-
विभागीय आयुक्त औरंगाबाद

प्रतिलिपीः
श्री.प्रमोद राठोड विरोधी पक्ष नेता महानगरपालिका औरंगाबाद व श्री.काशिनाथ कोकाटे गटनेता राष्ट्रवादी कॉग्रस
श्री.मीर हिदायत अली गटनेता कॉग्रेस आय
श्री.समीर राजूरकर गटनेता शहर प्रगती आघाडी व अपक्ष यांना माहितीस्तव

स्वाक्षरीत/-
विभागीय आयुक्त औरंगाबाद

मा.महापौर :संयुक्त लोकशाही आघाडीचे गटनेता श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार तसेच विरोधीपक्ष नेता श्री. प्रमोद राठोड व राष्ट्रवादी कॉग्रेसचे गटनेता श्री. काशिनाथ कोकाटे यांनी सभागृहात आपआपसात विचारविनिमय करून एक मताने चार पालिका सदस्यांचे नांवे माझे कडे दयावी त्यासाठी १० मिनिटाचा वेळ देण्यात येतो.(वेळ दु.१२-३२)

श्री.प्रमोद राठोड :विचारविनिमय कसा करायचा.

मा.महापौर :संयुक्त आघाडीकडून एकच पॉकीट यायला पाहिजे होते दोन पॉकीट आलेले आहे.त्यामुळे माझेपुढे पेचप्रसंग निर्माण झाला.त्यामूळे १० मिनिटाचा अवधी देत आहे तुम्ही आपआपसात विचार विनिमय करून ४ नांवे असलेले एकच पाकीट द्यावे.

श्री.काशिनाथ कोकाटे:जो आपण आताच नामउल्लेख केला श्री अ.साजेद अ.सत्तार यांचा गटनेता जे आहे त्यांचे नाव विभागीय आयुक्तांनी आपल्याकडे कळविले आहे का? किंवा त्यांना काही कळविलेले आहे का? सभागृहात पिठासीन अधिकारी म्हणून सर्व अधिकार आपल्याला आहे असे माझे मत आहे.कोणला मान्यता दयायची कोणाला दयायची नाही सभागृह नियमानुसार आपण चालवितो.त्या पध्दतीने चालविण्याचा संपूर्ण अधिकार आपल्याला आहे.शेवटी पिठासीन अधिकारी यांचा निर्णय हा अंतिम निर्णय आहे.त्यांना गटनेता कशावरून केले मा.विभागीय आयुक्त किंवा आपण सर्टीफाईड केलेले आहे का ?आम्ही सर्व सदस्य आपल्यासमोर स्वत:हून हजर आहोत विनंती की नियमाप्रमाणे जी वस्तुस्थिती आहे त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. किंवा ओपन मतदान घ्यावे. कोणाच्या बाजूने कशी परीस्थिती आहे.

श्री.संजय केनेकर :संयुक्त लोकशाही आघाडी ही नियमाप्रमाणे नाही का?

श्री.काशीनाथ कोकाटे :नाही.

श्री.संजय केनेकर : हे पीठासीन अधिकारी ठरवू शकत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :हा ठरविण्याचा अधिकार विभागीय आयुक्तांना आहे ते विभागीय आयुक्तांनी ठरवावे या सभागृहाला तो अधिकार नाही त्यामुळे सभागृहात आमच अस मत आहे की मा. विभागीय आयुक्तासमोर प्रत्यक्ष जावून नोंदणी करून आपला गट स्थापन करावा लागतो माझे मते सभागृहातील सर्व सदस्यांना या नियमाची माहिती आहे येथे मतदान घ्यावे या म्हणण्याला फारसा अर्थ नाही जो अधिकृत गट आहे त्यास मान्यता दिलेली आहे त्यांचे पाकीट आपण ॲक्सेप्ट करावे अशी विनती आहे.

श्री.प्रमोद राठोड :श्री.अ.साजेद अ.सत्तार हे संयुक्त लोकशाही आघाडीचे गटनेता आहे असे मा.विभागीय आयुक्तांनी आपणांकडे पत्र दिले आहे का? कोणी कळविले आहे का? कशाच्या अधारावर सांगतात की ते आमचे गटनेता आहेत. आम्ही पत्र देवून त्यांनंतर झालेल्या घडामोडीनंतर आम्ही आमचा गटनेता बदललेला आहे. बळजबरीने आम्हाला कुणी म्हणत असेल हा तुमच्या पक्षाचा गटनेता आहे हे आम्ही कसे सहन करायचे आम्ही सगळे सांगतो तो आमचा गट नेता नाही.

श्री.संजय केनेकर :आताच नगरसचिव यांनी पत्र वाचन केले त्यात गटनेता कडून पत्र घ्यायचे की विरोधी पक्ष नेता यांचेकडून असे काही दिले का?

श्री.काशिनाथ कोकाटे:काही वेळा हास्यास्पद येथे बोलले जाते..सभागृह नेता यांचे व विरोली पक्ष नेता यांचे अधिकार काय हे सर्वांना माहित आहे.आपण कोणस कोणात्या आधारे मान्यता देता हे माहित आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर:आमच्या माहिती प्रमाणे निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर ज्या नावाच्या यादया होतात त्यानंतर एक महिण्याच्या आत जे गट स्थापन होतात ते ५ वर्ष कायम असतात त्यात बदल करण्याचे त्या नियमात कुठेही नाहीत.त्यामूळे राष्ट्रीय लोकशाही आघाडी असो की संयुक्त लोकशाही आघाडी असो या गटामध्ये किंवा त्यांनी जे काही अगोदर सहया करून निवेदन केलेले आहे आमच्याही लोकांनी सहया करुन दिलेल्या आहेत. त्यामध्ये कुठलाही बदल ५ वर्ष करता येत नाही.

श्री.प्रमोद राठोड :स. जे काही सांगता ते बरोबर आहे परंतु नोंदणी करायची असेल तर त्यात पाच वर्ष काहीही करता येत नाही परंतु गटनेता हा विषय त्या ठिकाणी कोठेच नाही.कशाच्या अधारे सांगता की तो गटनेता आहे.राज्य शासनाने हे जे परीपत्रक पाठवले गटनेता अथवा विरोधी पक्ष नेता अथवा म्हणजे काय याचा ही खुलासा करावा.

श्री.संजय केनेकर :दोघांचेही पत्र आले हे म्हणतात हास्यास्पद आहे हींच गोष्ट हास्यास्पद आहे की दोघांचे आल्यांवर काय निर्णय घ्यायचा.

श्री.प्रमोद राठोड :आम्ही शासनाच्या परिपत्रकाचा आधार घेवून विनंती केली की,विरोधी पक्ष नेता मार्फत किंवा गटनेता यांचे मार्फत स्थायी समिती सदस्यांचे नामनिर्देशन करावे आपण निर्णय घ्यावा आम्ही आमची बाजू आपल्या पर्यत मांडली आहे.आपण योग्य तो निर्णय घ्यावा

श्री.रेणुकादास वैद्य :माझी विनंती की या वादात कृपया आपण जाण्यापेक्षा हा विषय शासनाकडे आपण पाठवून दयावा उर्वरीत जे पाकीट आहे ते ओपन करून सभागृहाचे कामकाज चालवावे.

श्री.विकास जैन :दोन गट स्थापन करण्यात आले होते शिवसेना-भाजपा व त्यामध्ये जे आघाडीचे सदस्यांनी जसे श्री. गिरजाराम हाळनोर यांना गटनेता म्हणून निवडले होते तसेच येथे बसलेले सर्वच आघाडीच्या सदस्यांची गटनेता म्हणून स. अ.साजेद अ.सत्तार यांना निवडले होते. स्वत:हून निवडले होते त्या पध्दतीने दोन गट फार्म करण्यात आले होते. आज काय झाले समजत नाही ते दोन्ही गट एकमेकांच्या विरोधात बोलत आहे.

श्री.संजय केनेकर :त्यावेळेस मा.विभागीय आयुक्ताकडे त्या त्या गटाचे नगरसेवक त्या गटामार्फत नांव द्यायचे बाळाचे नांव दोनदा ठेवल्या जात नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर:संयुक्त लोकशाही आघाडी विरोधी पक्ष नेता व त्यांचे गट नेता यांचा वाद आपसातला आहे आम्हाला त्यात पडायचे नाही. त्याबध्दल काही म्हणायचे नाही शासनाने जे पत्र महापालिकेला पाठविलेले आहे जे स.कैलास गायकवाड यांचे नेमणूक करण्याचा ठराव जो विखंडीत केला होता त्यामध्ये शासनाच्या पत्रातच असे म्हटलेले आहे एक मध्ये ,स.श्री. अ.साजेद अ.सत्तार हे संयुक्त लोकशाही आघाडीचे गटनेता आहेत.व त्यांनीच त्यांचे आघाडीतर्फे स्थायी समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन करणे आवश्यक होते असा येथे उल्लेख आहे. आम्हाला याचे बद्दल काही म्हणने नाही. आमची विनंती आहे की आपण दिलेली १० मिनिटांची वेळ संपलेली आहे.जर त्यांचे एकमत होत नसेल तर एकमताने आलेला प्रस्ताव पाकीट आपण उघडावे व

ज्याच्या बध्दल आपल्याला संयुक्तीक वाटत नाही कॉम्प्लीकेट वाटते ते शासनाच्या निर्णयासाठी पाठविण्यात यावे.

श्री.मीर हिदायत अली :मा.विभागायी आयुक्त यांचेकडून गटनेता म्हणून कोणाच्या नावाचे पत्र आलेले आहेत का? कोणाचेही नांव असो

मा.महापौर :१० मिनिटाचा अवधी दिलेला होता की आपआपसात चर्चा करून नावे दयावीत तो वेळ संपलेला आहे मा.विभागीय आयुक्त यांचेकडून पत्र आलेले आहे परंतु कायदयामध्ये अशी कोणतीही नियम नाही , दोन पत्र आल्यानंतर महापौरांनी कोणता निर्णय घ्यायचा.

श्री.काशिनाथ कोकाटे :आपल्याला अधिकार आहे आपण निर्णय घ्यावा.पिठासीन अधिकारी यांनी निर्णय घ्यायचा.

श्री.गिरजाराम हाळनोर :आपल्याला निर्णय घेण्याचा अधिकार आहे पण येथे कॉम्प्लीकेशन निर्माण झालेले आहे.आपण शासनाकडे पाठवावे.

श्री.प्रमोद राठोड :पुरावा काय आहे की ते गटनेता आहे मा.विभागीय आयुक्त यांनी तसे पत्र दिले आहे काय?गटनेता ते कसे आहे गटनेता त्यांना कसे म्हणू शकतो.

मा.महापौर :मी श्री.खांडेकर यांना विनंती करते की त्यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडी कडील आलेले पाकीट उघडावे.

या वेळी श्री.खांडेकर , उपआयुक्त (सिडको)हे पाकीट उघडतात.

श्री.मीर हिदायत अली :पत्र आले की नाही याचा खुलासा करावा.

श्री.प्रमोद राठोड :आम्हाला खुलासा करावा की गटनेता कशाच्या अधारे त्यांना म्हणता.मा.सचिव आपण निरूत्तर आहात मा.महापौर आपण खुलासा करीत नाही. खुलासा करावा.की का त्यांना आमचा गटनेता म्हणता आहात. मा.आयुक्तांनी खुलासा करावा का बर गटनेता म्हणता आहात आम्ही सर्वच्या सर्व सदस्य या ठिकाणी उपस्थित आहोत.मा.विभागीय आयुक्तांनी कळविले आहे का ते गटनेते आहेत.आजच्या तारखेचे पत्र आहेत का ते आमचे गटनेते आहेत. ही सर्व पक्षपाती भुमिका घेतली जाते आदरणीय महापौर आदरणीय उपमहापौर आदरणीय आयुक्त साहेब, नगर सचिव साहेब आपण आमच्या प्रश्नाचे उत्तर देत नाही आपण सर्व पक्षपाती भुमिका या ठिकाणी घेत आहात आम्ही सर्व संयुक्त लोकशाही आघाडीचे सदस्य या ठिकाणी उपस्थित आहोत.आम्हाला आपण न बोलता आमच्या प्रश्नाचे उत्तर न देता जबरदस्तीने आमच्या गटनेता दुसरेच संबोवधीत आहे.याचा खुलासा करावा आम्ही सर्वचे सर्व या ठिकाणी उपस्थिती आहे आपणांस विनंती आहे.

मा.महापौर :दिनांक ३० एप्रिल २०११ रोजी महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा संपन्न होत आहे या सभेत स्थायी समितीच्या सदस्यांचे नामनिर्देशन होणार आहे महानगरपालिकेत श्री. गिरजाराम हाळनोर गटनेता राष्ट्रीय लोकशाही आघाडी याचा ५६ पालिका सदस्यांचा मान्यताप्राप्त गट आहे या गटातून स्थायी समिती सदस्यांचे नामनिर्देशन करावयाचे असून आपणांस खालील प्रमाणे नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांची यादी जाहीर करीत आहे.पालिका सदस्यांचे नाव श्री. मेघावाले मोहन धन्नुलाल प्रभाग क्रमांक १५ व प्रभागाचे नाव स्वामी विवेकानंदनगर, श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव , ज्योतीनगर वार्ड क्र. ८९, श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोंपंत क्रांतीचौक वार्ड ६४, श्री. मुंडे बाळासाहेब दिनकर -जयभावानीनगर सिडको वार्ड क्र.८१.

श्री.प्रमोद राठोड :आम्ही आमच्या खुलाश्याची या ठिकाणी वाट बघत आहोत.कृपया खुलासा या ठिकाणी व्हावा.

श्री.गिरजाराम हाळनोर:त्याच प्रमाणे जे काही विषय समित्यावर सदस्यांची नेमणूक करावयाची आहे मी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा गटनेता म्हणून प्रत्येक समितीमध्ये ५-५ सदस्यांची नावे मी आपल्याकडे बंद पाकीटमध्ये देत आहेत.

श्री.काशिनाथ कोकाटे:स.विरोधी पक्ष नेता यांनी दिलेले पत्र उघडावे व त्यातील नावे आपण डिक्लेर करावी नियमाप्रमाणे नियमाला अधीन राहून हे काम करावे.

मा.महापौर :संयुक्त लोकशाही आघाडीचे गटनेता व विरोधी पक्ष नेता व श्री.काशिनाथ कोकाटे, राष्ट्रीय कॉंग्रेस यांना दिलेला १० मिनिटाचा वेळ आता संपलेला आहे.परंतु अद्याप त्यांचे त्यांच्या गटातून द्यावयाच्या चार सदस्यांच्या नावाबाबत एकमत झालेले दिसत नाही त्यामूळे संयुक्त लोकशाही आघाडीच्या कोटयातून चार सदस्यांनी नियुक्ती करण्याबाबत पेच निर्माण झालेला आहे सर्व पालिका सदस्यांच्या भावना लक्षात घेता संयुक्त लोकशाही आघाडीचे गटनेता व विरोधीपक्ष नेता / राष्ट्रवादी कॉंग्रेसचे गटनेता यांनी दिलेले बंद लिफाफे न उघडता सदरील स्थायी समिती चार सदस्य निवड प्रकरणात शासनाचे मार्गदर्शन घेणे योग्य राहील व शासनाचे मार्गदर्शन आल्यानंतर बंद लिफाफे उघडण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. याकरिता महानगरपालिकेचा विषेष दूत शासनाकडे पाठविण्यात येईल व शासन जो निर्णय देईल तो मान्य करण्यात येईल.व त्यानुसार सदस्य निवडीची कार्यवाही लवकरच करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालका अधिनियम १९४९ चे कलम २०(३) अन्वये स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या ०८ जागांवर कलम ३१-अ खालील तरतुदी प्रमाणे व नियमानुसार मान्यता प्राप्त नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन व त्यानुसार राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा लिफाफा उघडून प्राप्त झालेल्या यादीनुसार पालिका सदस्यांपैकी खालील ४ पालिका सदस्यांचे स्थायी समिती सदस्य म्हणून नामनिर्देशनास मान्यता देण्यात येते.

०१. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
०२. श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
०३. श्री. वैद्य रेणूकादास (राजू)दत्तोंपत
०४. श्री. मुंडे बाळासाहेब दिनकर

तसेच संयुक्त लोकशाही आघाडी तर्फे एक पेक्षा जास्त बंद लिफाफे सभागृहात प्राप्त झाल्याने तौलनिक संख्याबळानुसार संयुक्त लोकशाही आघाडीचे देखील स्थायी समितीच्या चार पदांवर नांवे देण्यास त्यांना १० मिनिटांचा अवधी देवूनही संयुक्त लोकशाही आघाडीचे एकमत न झाल्याने त्यांचे लिफाफे न उघडता संयुक्त लोकशाही आघाडीचे दोन लिफाफ्यापैकी कोणता एक लिफाफा उघडण्यात यावा या बाबत शासनाचे मागदर्शन घेणेस व शासनाचे या बाबत निर्णय प्राप्त झाल्यानंतर संयुक्त लोकशाही आघाडीचे स्थायी समितीवर ०४ सदस्य नामनिर्देशित करण्याची नियमानुसार करावी लागणारी कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.प्रमोद राठोड :ही पक्षपाती पणाची भुमिका आहे आपण उत्तर देत नाही आपण गटनेता म्हणून का संबोधित करता आहोत त्यांना आपण का बर मानता त्यांना. पक्षापाती भुमिका या ठिकाणी घेत आहे मा.आयुक्त आपण उत्तर दयावे आपण उत्तर का देत नाही याचा अर्थ काय समजावा आम्ही.

श्री.गिरजाराम हाळनोर:आपण घेतलेला निर्णय निपक्षपाती पणाचा आहे.आपण जो निर्णय घेतला त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. आता पुढील विषय पत्रिकेच्या संदर्भात कामकाज चालू करावे.आता विशेष समित्यावर नामनिर्देशीत करावयाचे सदस्यांची नावे देत आहोत.

या वेळी स.सभागृहनेता श्री.गिरजाराम हाळनोर यांनी बंद पाकीट मा.महापौराकडे दिले.

श्री.प्रमोद राठोड :जनतेने काय समजावे या ठिकाणी, ४० सदस्य एका बाजूने असतांना जाणूनबूजून हे आपण येथे करता आहेत.आपण जाणूनबजून एका व्यक्तीला स्वतःच्या स्वार्थासाठी आमचे हे पद प्रलंबीत ठेवत आहे.ते गटनेता कशावरून आहे याचे उत्तर का देत नाही. खुलासा का करत नाही?

**<u>विषय क्र.३००:</u>**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि कलम ३१-अ आणि सभा कामकाज नियमावली (जादा नियम) चे नियम ७४ अन्वये महिला व बालकल्याण समितीच्या नऊ सभासदांची नियुक्ती करणे.

टिप: महिला व बालकल्याण समितीचे सदस्यापैकी किमान ७५% सदस्य हे महिला पालिका सदस्य पैकी असतील

मा.महापौर :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१)आणि कलम ३१-अ आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम ७४ अन्वये महिला व बाल कल्याण समितीच्या नऊ सभासदांची नियुक्ती करणे.

श्री.प्रमोद राठोड :आपण पक्षपाती भुमिका का घेत आहात आपण आम्हाला उत्तर दयावे.उत्तर कुणीच देत नाही आमच्या प्रश्नाचे उत्तर का देत नाही.खुलासा करावा कशामूळे आपण यांना गटनेता म्हणता आहेत.

श्री.गिरजाराम हाळनोर :आपण घेतलेला निर्णय योग्य आहे कृपया आता पुढील कामकाजास सुरूवात करावी.

श्री.संजय केनेकर :आपण घेतलेला निर्णय योग्य आहे तो शासनाकडे पाठवावे.पुन्हा विनंती करतो.

श्री.प्रमोद राठोड :मा.महापौर, मा.आयुक्त यांना आमची व आमच्या सर्व सदस्यातर्फे विनंती की आम्हाला खुलासा करावा आमच्या प्रश्नाचा.का बर बळजबरीने त्या नावाचा गटनेता करीत आहात आमचा आम्ही पत्र दिलेले आहे आपल्याकडे,हे जे आपण करीत आहोत ते चुकीचे आहे.आम्हाला संयुक्त लोकशाही आघाडीच्या कोणलाही हे मान्य नसेल.आम्ही सर्व एका बाजूने असतांना आपण जाणूनबूजून पक्षपाती पणाची भुमिका घेत आहोत.

याच वेळी मा.महापौर डायस समोर अनेक स.सदस्य जमा होतात एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :हा पक्षातंर्गत वाद आहे तुमचा .

श्री.प्रमोद राठोड :हा प्रक्षातंर्गतचा वाद नाही सर्व मिळून हा अन्याय आहे आमच्यावर

श्री.गिरजाराम हाळनोर:पुढील विषय पत्रिका घेण्यात यावी.जे पाकीट दिले ते उघडण्यात यावे.

श्री.प्रमोद राठोड :सचिव यांनी खुलासा केलेला नाही मा.आयुक्त का उत्तर देत नाही.आम्ही आपल्यालाला शांत व नम्रपणे विनंती करून सांगतो आहे की श्री.मीर हिदायत अली हे आमचे गटनेता आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर:स.सदस्यांना विनंती आहे महापौरावंर दबाव आणू नये मा.महापौरांनी घेतलेला निर्णय योग्य आहे.

श्री.प्रमोद राठोड :कशाच्या अधारे त्यांना गटनेता म्हणता हे आम्हाला उत्तर दयावे.उत्तर देत नाही यांचा अर्थ आम्हाला जाणूनबजून पक्षपाती भुमिका घेत आहात स्थायी समितीच्या सदस्यातून बाजूला ठवेत आहात

या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.गिरजाराम हाळनोर:विनंती आपण पुढील विषय पुकारलेला आहे कार्यवाही सुरू करावी.राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा गटनेता म्हणून मी आपल्याकडे बंद पाकीट दिले आहे.कृपया त्या सदस्यांच्या नावाची घोषणा करण्यात यावी.

श्री.प्रमोद राठोड :मा.उपमहापौर हे काय आहे. ते गटनेता कशावरून आहे खुलासा करावा.

याच वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.गिरजाराम हाळनोर:सभागृहाचा वेळ वाया घालवू नये पूढील कामकाज सुरू करावे.

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे नगरसचिव खुलासा करतील.

श्री.प्रमोद राठोड :सचिव खुलासा करीत नसतील तर मा.आयुक्तांनी करावा.आपण योग्य भुमिका घेवू शकता.

नगर सचिव मा.विभागीय आयुक्त यांचेकडे दोन्ही गट नोंदणी झाल्याचे मी माझ्या सुरवातीच्या टिप्पणीमध्ये म्हटले आहे दिनांक १८-५-२०१० चे पत्र आहे.

जा.क्र.२०१०/साप्रकक्ष-४/नपाप्र/आस्था/कावि-.४८४
विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद
दि १८-५-२०१०.

प्रति,
श्री.अ.साजेद अ.सत्तार
घ.क्र.१-२२-९९ चेलीपुरा
औरंगाबाद.

विषय :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ)नुसार महानगरपालिकेत आघाडीची नोंदणी करणे बाबत.

संदर्भ :१. या कायालयाने आपणास दिलेले पत्र क्र. २०१०/साप्रकक्ष-४/नपाप्र/आस्था/कावि-४७० दि. १३.०५.२०१०
०२. आपण या कार्यालयास दिलेले पत्र दिनांक १४.०५.२०१०
०३. श्री.गिरजाराम हळनोर यांचा राष्ट्रीय लोकशाही आघाडीची नोंद घेण्यासंबधीचा अर्ज दिनांक १४.०५.२०१०.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ वरील पत्रानुसार ४६ महानगरपालिका सदस्यांच्या संयुक्त लोकशाही आघाडी ची नोंदणी करून आपणांस कळविण्यात आले होते. तथापि संदर्भ क्रमांक ३चे अर्जानुसार श्री.गिरजाराम हळनोर यांनी ५६ महानगरपालिका सदस्यांची राष्ट्रीय लोकशाही आघाडीची नोंदणी करण्यासाठी यादी दाखल केल्यानंतर आपण आले संदर्भ क्र.२ वरील अर्जानुसार संयुक्त लोकशाही आघाडीतील सदस्यांची नावे आपले म्हणने ऐकल्याशिवाय बदलु नयेत अशी विनंती केली. आपले दिनांक १४.०५.२०१० रोजीचे अर्जानुसार आपणांस दिनांक १७.०५.२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता प्रकरणे आपले म्हणने मांडण्यासाठी पाचारण करण्यात आले. त्यावेळी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी दोन आठवडयाचा अवधी मागितला. नैसर्गिक न्यायतत्वास.

श्री.प्रमोद राठोड :गटनेता आहे म्हणून कुठे आहे -

नगरसचिव :जे पत्र आहे ते मी वाचन करीत आहे.

या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.गिरजाराम हाळनोर :विनंती आहे की आपण स्थायी समितीच्या सदस्या बाबत जो निर्णय दिलेला आहे आता पुढील कामकाजास सुरूवात करावी आम्ही राष्ट्रीय लोकशाही

आघाडीच्या वतीने आपल्याडे समित्याच्या सदस्यांची नावे दिलेली आहे ती घोषीत करण्यात यावी आपण घेतलेला निर्णय योग्य आहे जर दोन पाकीट आले असतील तर या बाबत शासनाचे निर्देश व मार्गदर्शन घेणेसाठी ते प्रकरण शासनाकडे सुखरूप करावे.पुढील कामकाम सुरू करावे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या वतीने विषय समित्याचे सदस्य पदासाठी आम्ही आपल्याकडे नावे दिलेली आहे ती वाचून दाखववावी.

मा.महापौर :राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या वतीने माझेकडे दुसरे पाकीट आलेले आहे श्री.अजय चारठाणकर, उपआयुक्त यांनी ते पाकीट उघडावे.

या वेळी उपआयुक्त श्री. अजय चारठाणकर यांनी पाकीट उघडले (वेळ दु. १२-५० वाजता)

श्री.काशिनाथ कोकाटे:नगरसचिव यांना खुलासा करण्याचे आदेशीत करावे शेवटी आपण पिठासीन अधिकारी आहात.

श्री.गिरजाराम हाळनोर:जे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे अधिकृत सदस्यांची नावे आपल्याकडे दिली आहे ते जाहिर करावे

मा.महापौर :दिनांक ३० एप्रिल २०११ रोजी महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा संपन्न होत आहे महानगरपालिकेत श्री. गिरजाराम हाळनोर, गटनेता राष्ट्रीय लोकशाही आघाडी यांच्या (अनेक सदस्य बोलत असतात)

श्री.गिरजाराम हाळनोर :मा.महापौर आम्ही राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्यांची नांवे दिली आहे. ते कृपया जाहिर करावे.

मा.महापौर :५६ पालिका सदस्यांचा मान्यताप्राप्त गट आहे या गटांतून विविध विषय समिती सदस्यांचे नामर्निदेशन करावयाचे असून आपणांस खालील प्रमाणे नामनिर्देशित करावयाच्या विविध विषय समितीवरील पालिका सदस्याची यादी घोषित करीत आहे.महिला व बाल कल्याण समितीच्या सदस्य पदासाठी सौ.कला रविनंदन ओझा वार्ड क्र.७० विद्यानगर, सौ.वाणी सावित्रीबाई हिरालाल वार्ड क्र.०८ पडेगांव, सौ.सोनवणे सुनिता सुनिल वार्ड क्र.५९ अजबनगर खोकडपुरा, सौ.कमल रामचंद्र नरोटे वार्ड क्र.८० अंबिकानगर मुकूंदवाडी,सौ.उर्मिला नितीन चित्ते वार्ड क्र.१८ पवन नगर.

<u>**ठराव:**</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१)आणि ३१-अ आणि सभा कामकाज नियमावली (जादा नियम)चे नियम ७४ अन्वये मान्यता प्राप्त, नोकदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून व त्यानुसार सभागृहात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा लिफाफा उघडून प्राप्त झालेल्या यादीनुसार पालिका सदस्यापैकी खालील ५ पालिका सदस्यांचे महिला व बाल कल्याण समिती सदस्य म्हणून नामनिर्देशनास मान्यता देण्यात येते.

०१. सौ.कला रविनंदन ओझा,
०२. सौ.वाणी सावित्रीबाई हिरालाल,
०३. सौ.सोनवणे सुनिता सुनिल,
०४. सौ.कमल रामचंद्र नरोटे,
०५. सौ.उर्मिला नितीन चित्ते.

तसेच संयुक्त लोकशाही आघाडी तर्फे एक पेक्षा जास्त बंद लिफाफे सभागृहात प्राप्त झाल्याने सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संयुक्त लोकशाही आघाडीचे एकमत न झाल्याने त्यांचे लिफाफे न उघडता संयुक्त लोकशाही आघाडीचे दोन लिफाफ्यापैकी कोणता एक लिफाफा उघडण्यात यावा या बाबत शासनाचे मागदर्शन घेणेस व शासनाचा या बाबत निर्णय प्राप्त झाल्या नंतर संयुक्त लोकशाही आघाडीचे महिला व बाल कल्याण समितीवर ०४ सदस्य नामनिर्देशित

करण्याची नियमानुसार करावी लागणारी कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०४:**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि कलम ३१-अ आणि सभा कामकाज नियमावली (जादा नियम) चे नियम ७४ अन्वये गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाजकल्याण समितीच्या नऊ सभासदांची नियुक्ती करणे.

मा.महापौर :गलिच्छ वस्तीसुधार समिती सदस्य पदासाठी श्रीमती खिल्लारे ज्योती रमेश वार्ड क्र.१२ घाटीपरिसर आसेफिया कॉलनी श्री. बन्सी ग्यानू जाधव वार्ड क्र.०१ हर्सूल, सौ.सलामपुरे पुष्पा देवीदास वार्ड क्र.०५ आसेफिया दिलरस कॉलनी, श्री.चौधरी संजय सांडू वार्ड क्र.२३ मसनतपुर चिकलठाणा, श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण वार्ड क्र.५२ इंदिरानगर (द) बायजीपुरा.

**ठराव:**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि कलम ३१-अ आणि सभा कामकाज नियमावली (जादा नियम) चे नियम ७४ अन्वये मान्यता प्राप्त, नोकदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून व त्यानुसार सभागृहात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा लिफाफा उघडून प्राप्त झालेल्या यादीनुसार पालिका सदस्यापैकी खालील ५ पालिका सदस्यांचे गलिच्छ वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाजकल्याण समिती सदस्य म्हणुन नामनिर्देशनास मान्यता देण्यात येते..

०१. श्रीमती खिल्लारे ज्योती रमेश
०२. श्री. बन्सी ग्यानू जाधव,
०३. सौ.सलामपुरे पुष्पा देवीदास,
०४. श्री.चौधरी संजय सांडू
०५. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

तसेच संयुक्त लोकशाही आघाडी तर्फे एक पेक्षा जास्त बंद लिफाफे सभागृहात प्राप्त झाल्याने सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संयुक्त लोकशाही आघाडीचे एकमत न झाल्याने त्यांचे लिफाफे न उघडता संयुक्त लोकशाही आघाडीचे दोन लिफाफ्यापैकी कोणता एक लिफाफा उघडण्यात यावा या बाबत शासनाचे मागदर्शन घेणेस व शासनाचा या बाबत निर्णय प्राप्त झाल्या नंतर संयुक्त लोकशाही आघाडीचे गलिच्छ वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाजकल्याण समितीवर ०४ सदस्य नामनिर्देशित करण्याची नियमानुसार करावी लागणारी कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०३:**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) आणि कलम ३१-अ आणि सभा कामकाज नियमावली (जादा नियम) चे नियम ७४ अन्वये माध्यमिक, पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीच्या नऊ सभासदांची नियुक्ती करणे.

मा.महापौर :माध्यमिक पुर्व माध्यमिक तांत्रिक शाळा समिती सदस्य पदासाठी श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग वार्ड क्र.६ बेगमपुरा, श्री.दहिहंडे मनीष चंद्रकांत वार्ड क्र.२२ नारेगांव, सौ.भाले प्राजक्ता मंगेश वार्ड क्र.२६ गणेशनगर, श्री.जोशी संजय रामदास वार्ड क्र.८७ उल्कानगरी, श्री.बबन पंडितराव नरवडे वार्ड क्र.६२ कोटला कॉलनी.

**ठराव:**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि कलम ३१-अ आणि सभा कामकाज नियमावली (जादा नियम) चे नियम ७४ अन्वये मान्यता प्राप्त, नोकदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून व त्यानुसार सभागृहात राष्ट्रीय लोकशाही

आघाडीचा लिफाफा उघडून प्राप्त झालेल्या यादीनुसार पालिका सदस्यापैकी खालील ५ पालिका सदस्यांचे माध्यमिक पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती सदस्य म्हणुन नामनिर्देशनास मान्यता देण्यात येते..

०१. श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग,
०२. श्री.दहिहंडे मनीष चंद्रकांत,
०३. सौ.भाले प्राजक्ता मंगेश,
०४. श्री.जोशी संजय रामदास,
०५. श्री.बबन पंडितराव नरवडे

तसेच संयुक्त लोकशाही आघाडी तर्फे एक पेक्षा जास्त बंद लिफाफे सभागृहात प्राप्त झाल्याने सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संयुक्त लोकशाही आघाडीचे एकमत न झाल्याने त्यांचे लिफाफे न उघडता संयुक्त लोकशाही आघाडीचे दोन लिफाफ्यापैकी कोणता एक लिफाफा उघडण्यात यावा या बाबत शासनाचे मागदर्शन घेणेस व शासनाचा या बाबत निर्णय प्राप्त झाल्या नंतर संयुक्त लोकशाही आघाडीचे माध्यमिक पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीवर ०४ सदस्य नामनिर्देशित करण्याची नियमानुसार करावी लागणारी कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०२:**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि कलम ३१-अ आणि सभा कामकाज नियमावली (जादा नियम)चे नियम ७४ अन्वये शहर सुधार समितीच्या नऊ सभासदांची नियुक्ती करणे.

मा.महापौर :शहर सुधार समिती सदस्य पदासाठी श्री. नागरे किशोर बाबुराव वार्ड क्र.१६ मयुरनगर सुदर्शनगर, श्री. खेडकर सुशील तुकाराम वार्ड क्र.८५ गारखेडा, श्री.दिग्वीजय संभाजी शेरखाने वार्ड क्र.८२ भारतनगर मातोश्रीनगर गारखेडा, श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र वार्ड क्र.८४ कल्पतरु कॉ.बाळकृष्णनगर, श्री.अनिल श्रीकिसन मकरिये वार्ड क्र.३७ औरंगपुरा पैठणगेट.

**ठराव:**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि कलम ३१-अ आणि सभा कामकाज नियमावली (जादा नियम) नियम ७४ अन्वये मान्यता प्राप्त, नोकदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून व त्यानुसार सभागृहात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा लिफाफा उघडून प्राप्त झालेल्या यादीनुसार पालिका सदस्यापैकी खालील ५ पालिका सदस्यांचे शहर सुधार समिती सदस्य म्हणून नामनिर्देशनास मान्यता देण्यात येते..

०१.श्री. नागरे किशोर बाबुराव
०२.श्री. खेडकर सुशील तुकाराम ,
०३.श्री. दिग्वीजय संभाजी शेरखाने,
०४.श्री. भारसाखळे पंकज रामचंद्र,
०५ श्री. अनिल श्रीकिसन मकरिये

तसेच संयुक्त लोकशाही आघाडी तर्फे एक पेक्षा जास्त बंद लिफाफे सभागृहात प्राप्त झाल्याने सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संयुक्त लोकशाही आघाडीचे एकमत न झाल्याने त्यांचे लिफाफे न उघडता संयुक्त लोकशाही आघाडीचे दोन लिफाफ्यापैकी कोणता एक लिफाफा उघडण्यात यावा या बाबत शासनाचे मागदर्शन घेणेस व शासनाचा या बाबत निर्णय प्राप्त झाल्या नंतर संयुक्त लोकशाही आघाडीचे शहर सुधार समितीवर ०४ सदस्य नामनिर्देशित करण्याची नियमानुसार करावी लागणारी कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०१:**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि कलम ३१-अ आणि सभा कामकाज नियमावली (जादा नियम) चे नियम ७४ अन्वये वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीच्या नऊ सभासदांची नियुक्ती करणे.

मा.महापौर :वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सदस्य पदासाठी सौ.सुरे सविता संतोष वार्ड क्र. ०२ मयुरपार्क जाधववाडी, श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल वार्ड क्र. ७१ न्यायनगर, श्री.गादगे विरभंद्र रामलिग वार्ड क्र. ४८ अविष्कार कॉलनी, श्री.महेश शिवाजी माळवतकर वार्ड क्र.१७ श्रीकृष्णनगर, श्री. घडमोडे सविता भगवान वार्ड क्र.७७ कामगार कॉलनी विठ्ठलनगर.

**ठराव:**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) आणि कलम ३१-अ आणि सभा कामकाज नियमावली (जादा नियम) चे नियम ७४ अन्वये मान्यता प्राप्त, नोकदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून व त्यानुसार सभागृहात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा लिफाफा उघडून प्राप्त झालेल्या यादीनुसार पालिका सदस्यापैकी खालील ५ पालिका सदस्यांचे वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सदस्य म्हणून नामनिर्देशनास मान्यता देण्यात येते.

०१. सौ. सुरे सविता संतोष,
०२. सौ.निरपगारे पुष्पा कांतीलाल,
०३. श्री.गादगे विरभंद्र रामलिग,
०४. श्री.महेश शिवाजी माळवतकर,
०५. श्री. घडमोडे सविता भगवान

तसेच संयुक्त लोकशाही आघाडी तर्फे एक पेक्षा जास्त बंद लिफाफे सभागृहात प्राप्त झाल्याने सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संयुक्त लोकशाही आघाडीचे एकमत न झाल्याने त्यांचे लिफाफे न उघडता संयुक्त लोकशाही आघाडीचे दोन लिफाफ्यापैकी कोणता एक लिफाफा उघडण्यात यावा या बाबत शासनाचे मागदर्शन घेणेस व शासनाचा या बाबत निर्णय प्राप्त झाल्या नंतर संयुक्त लोकशाही आघाडीचे वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीवर ०४ सदस्य नामनिर्देशित करण्याची नियमानुसार करावी लागणारी कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :संयुक्त लोकशाही आघाडीमध्ये एकमत न झाल्याने निर्णयासाठी शासनाकडे पाठवित आहे.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद